# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.५२१५/२०२४/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.गणेश निवृत्ती सांगळे,<br>रा.मु.पानेवाडी, पो.नागापूर,<br>ता.नांदगांव, जि.नाशिक. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी.<br>ता.नांदगांव, जि.नाशिक. | विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),<br>पंचायत समिती, नांदगांव.<br>ता.नांदगांव, जि.नाशिक. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.२६/०३/२०२४ रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन ३१ मार्च २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१) सन ३१ मार्च २०२३ ते ३१ मार्च २०२४ ग्रामपंचायत यांना मिळालेले एकूण उत्पन्न किती व केलेला खर्च किती या बाबींची सविस्तर माहिती मिळालीच पाहिजे.

२) २०२३ ते २०२४ ग्राम निधी व १५ वा वित्त आयोग यामार्फत किती निधी मिळाला व तो कोठे खर्च करण्यात आला याची सविस्तर माहिती मिळावी.

३) सन २०२३ ते २०२४ या कालावधीत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते व इतर रस्ते यावर किती खर्च करण्यात आला व रस्ते कोणत्या गल्ली व कोणत्या चौकात बनवले याची सविस्तर माहिती मिळालीच पाहिजे.

२. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.३१/१०/२०२५ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी ता.नांदगांव, जि.नाशिक (श्री.पी.एस.सांगळे) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

३. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी ता.नांदगांव, जि.नाशिक श्री.पी.एस.सांगळे यांनी आयोगाकडे दि.२६/०२/२०२६ रोजी लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, श्री.गणेश निवृत्ती सांगळे यांनी दि.२६/०३/२०२४ चे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेकामी अर्ज ग्रामपंचायत पानेवाडी यांना केलेला असून संबंधित अर्जदाराने प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली होती. माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने पुरविण्यात आलेली नाही. तरी खुलासा मान्य करण्यात यावा ही नम्र विनंती.

४. अपिलार्थी यांच्या दि.२६/०३/२०२४ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी ता.नांदगांव, जि.नाशिक श्री.पी.एस.सांगळे यांनी कोणतीही माहिती /उत्तर अपिलार्थी यांना दिल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थी यांनी दि.०६/०५/२०२४ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने देखील प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी ता.नांदगांव, जि.नाशिक श्री.पी.एस.सांगळे यांनी कोणतीही माहिती

/उत्तर अपिलार्थी यांना दिल्याचे दिसून येत नाही. यावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य नसल्याचे स्पष्ट होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी ता.नांदगांव, जि.नाशिक श्री.पी.एस.सांगळे यांनी दिलेल्या लेखी खुलाशात असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने पुरविण्यात आलेली नाही तथापि अपिलार्थींनी दि.२६/०३/२०२६ च्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे दिसून येत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी ता.नांदगांव, जि.नाशिक श्री.पी.एस.सांगळे यांनी आयोगाकडे सादर केलेला खुलासा समर्थनीय नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पानेवाडी ता.नांदगांव, जि.नाशिक (श्री.पी.एस.सांगळे) यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **“००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)”** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.५२१५/२०२४/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक.

---

जावक क्र. २०४० दिनांक :- 23 MAR 2026

---